महाराष्ट्र फुटबॉल मिशन १ मिलियन कार्यक्रमाच्या आढाव्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन परिपत्रक क्र.फिफामी-२०१७/प्र.क्र.१००/क्रीयुसे-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ०८ सप्टेंबर, २०१७.

प्रस्तावना:-

देशात दिनांक ६ ऑक्टोबर,२०१७ ते २८ ऑक्टोबर,२०१७ या कालावधीत फिफा १७ वर्षाखालील खेळाडूंसाठी जागतिक फुटबॉल स्पर्धा संपन्न होणार आहे. सदर स्पर्धेच्या अनुषंगाने मा. पंतप्रधान यांच्या मार्गदर्शनाखाली देशात फुटबॉल मिशन १ मिलियन हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या स्पर्धेतील सामने देशातील दिल्ली, मुंबई, पणजी, गुवाहाटी व कोलकाता या शहरात पार पाडणार आहेत. त्यापैकी काही सामने राज्यातील डी.वाय.पाटील स्टेडियम, नवी मुंबई येथे आयोजित केले जाणार आहेत. सदर स्पर्धेच्या आयोजनाच्या अनुषंगाने उद्भवणा-या विविध बाबी संदर्भात उदा. कायदा व सुव्यवस्था, करसवलत, करमणुकीवरील कर, स्थानिक संस्था कर, वैद्यकीय सुविधा,व्हीआयपी सुरक्षा व्यवस्था पुरविणे याबाबत आयुक्त,नवी मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली आढावा समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

फेडरेशन ऑफ फुटबॉल असोसिएशन(FIFA) मार्फत १७ वर्षाखालील खेळाडूंसाठी फुटबॉल वर्ल्ड कप स्पर्धा घेण्यात येणार आहे. सदरच्या स्पर्धा दि.६ ऑक्टोबर ते २८ ऑक्टोबर,२०१७ या कालावधीत देशात आयोजित करण्यात आली असून एकूण सामन्यांपैकी ६ सामने नवी मुंबई, डी.वाय.पाटील स्टेडीयम येथे घेण्यात येणार आहे. या अनुषंगाने कोणत्या विभागाने कोणती कार्यवाही करावी हे ठरविण्यासाठी दिनांक १७.०७.२०१७ रोजी मा. मुख्य सचिव यांचे स्तरावर बैठक घेण्यात आली असून त्याचे इतिवृत्त दिनांक ०९.०८.२०१७ रोजी संबंधित विभागांना पाठविण्यात आले आहे. या सामन्याच्या पार्श्वभूमीवर १७ वर्षाखालील खेळाडूंसाठी फुटबॉल वर्ल्ड कप स्पर्धा-२०१७ सुरळीत पार पाडण्यासाठी पर्यवेक्षण व संनियंत्रणासाठी खालील समिती गठीत करण्यात येत आहे. या समितीने स्पर्धा पूर्ण होईपर्यंत दर आठवडयात बैठक घ्यावी व त्याचा अहवाल मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मा. मुख्य सचिव तसेच प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांना सादर करण्यात यावा.

१) आयुक्त नवी मुंबई महानगरपालिका	अध्यक्ष
२) अतिरिक्त महासंचालक (सुरक्षा),महाराष्ट्र राज्य	सदस्य
३) पोलीस आयुक्त, नवी मुंबई	सदस्य
४) उपसचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग	सदस्य
५) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,कोकण विभाग	सदस्य
६) पोलीस आयुक्त, वाहतुक, नवी मुंबई	सदस्य
७) संचालक,सार्वजनिक आरोग्य विभाग	सदस्य
८) संचालक, अग्नीशमन दल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.	सदस्य
९) संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई.	सदस्य
१०) महासंचालक,माहिती व जनसंपर्क यांचे प्रतिनिधी	सदस्य
११) कमांडट, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन, पुणे	सदस्य
१२) उपसंचालक क्रीडा व युवक सेवा,मुंबई तथा नोडल ऑफिसर	सदस्य सचिव

ही समिती स्वच्छता, रस्ते दुरुस्ती, सुरक्षा, प्रदूषण, वाहनतळ व्यवस्था, आरोग्य विषयक प्रतिबंधात्मक उपाययोजना, वाहतुक व्यवस्था, सुशोभिकरण व प्रसिध्दी याबाबीचा नियमित आढावा घेऊन अपूर्ण कामाचे कालबध्द नियोजन करण्याची दक्षता घेईल. सदर समितीचा कार्यकाळ दोन महिने राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०९०८१६५६५२९८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2017.09.08 16:46:08 +05'30'

(राजेंद्र पवार)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
२. मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे खाजगी सचिव,
३. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय ,मुंबई.
५. प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, पर्यटन व सांस्कृति कार्य विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
७. सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
८. सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय,मुंबई
९. सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग,मुंबई
१०. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई. (उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग मुंबई मार्फत)
१२. अतिरिक्त महासंचालक,सुरक्षा, (उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग मुंबई मार्फत)
१३. पोलीस आयुक्त, नवी मुंबई. (उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग मुंबई मार्फत)
१४. आयुक्त(परिवहन), नवी मुंबई. (उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग मुंबई मार्फत)
१५. सह पोलीस आयुक्त(वाहतुक), नवी मुंबई. (उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग मुंबई मार्फत)
१६. संचालक, अग्नीशमन दल, महाराष्ट्र राज्य, मुंबई. (उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग मुंबई मार्फत)
१७. कमांडट, आपत्ती व व्यवस्थापन,पुणे (उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग मुंबई मार्फत)
१८. संचालक, आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई. (उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग मुंबई मार्फत)
१९. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,कोकण विभाग, नवी मुंबई. (उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग मुंबई मार्फत)
२०. संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई. (उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग मुंबई मार्फत)
२१. उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग, मुंबई तथा नोडल ऑफिसर.